<u>रेग्यु. दिवाणी मुकदमा नं. ४६/२०१७ मधील नि. १६ आदेश</u>

<u>CNR No.: MHSI05-000218-2017</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांच्या तर्फे दाखल करण्यात आलेला असुन या अर्जाअन्वये प्रतिवादी क्र. १ हे त्यांच्या विरुध्द झालेला विना कैफियतीचा आदेश रद्द बातल करुन त्यांची कैफियत फैलावर घेण्यासाठी केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. १च्या मते आवश्यक ती कागदपत्रे वेळीच उपलब्ध होवू न शकल्याने व ते त्यांचे वकिलांना आवश्यक ती माहिती पुरवू न शकल्याने सदर दाव्याचे कामी मुदतीत दाव्याच्या गुणदोषांवर कैफियत दाखल करु शकले नाही. या अर्जासोबत प्रस्तुत प्रतिवादी कैफियत दाखल करीत आहेत. ते पुढे असे कथन करतात की कैफियत मुदतीत दाखल न करण्यामागे त्यांचा कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा नव्हता व नाही तसेच प्रतिवादी क्र. १ची कैफियत दाखल करुन न घेतल्यास प्रस्तुत दाव्याच्या गुणदोषांवर निकाल होणेस अडचण निर्माण होणारी आहे तसेच त्याच्यावर अन्याय होणारा आहे. सबब त्यांची कैफियत दाखल करुन घ्यावी असे त्यांचे म्हणणे आहे.

३. या म्हणण्यात वादीने अर्जावरच म्हणणे सादर करुन अर्जाचे खंडण केले आहे. प्रतिवादी क्र. १चे अर्जातील कारण पुरेसे नसल्याने अर्ज नामंजूर करावा असे म्हंटलेले आहे.

४. दाव्याचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा हा खुला कब्जा व रक्कम वसुली मिळण्यास दाखल करण्यात आलेला आहे. एकंदरीत दाव्याचे स्वरुप पहाता प्रतिवादी क्र. ६१ ची कैफियत फैलावर घेणे आवश्यक असल्यामुळे त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे. प्रतिवादीने केलेला उशीर हा हेतु पुरस्कर आहे असे दिसत नाही. सबब त्यांची कैफियत फैलावर घेणे योग्य राहिल. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. प्रतिवादी क्र. १ यांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ यांच्या विरुध्द झालेला कैफियत नाही असा आदेश रद्दबातल करण्यात येत आहे.

सही/—

दिनांक— ०८/०६/२०१८

(वि. द. पाटील)

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.